नि.दि.दा. क्र. ६९/२०१७
कलावती वि. वत्सला
CNR No.MHWS080007402017

# <u>निशाणी क्र. ५३ खाली आदेश</u>
## (पारित दिनांक २३.०२.२०२१)

वादीच्या वकीलांनी सदरचा अर्ज वादी क्र. ०२ चे वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यांचे कथनानुसार प्रकरण वाटणी होऊन ताबा मिळणेबाबतचे असुन प्रकरणात प्रतिवादी यांनी जवाब दावा दाखल केला आहे. प्रकरण पुराव्याकरीता नेमलेले असतांना दिनांक ०४.०८.२०२० रोजी वादी क्र. ०२ मयत झाले असुन अर्जदार हेच तिचे वारस आहेत. त्याशिवाय इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदारांना दिनांक ०४.०९.२०२० रोजी वादी क्र. ०२ चे मृत्यु प्रमाणपत्र दिले व वारसाचा दाखला दिनांक २३.०९.२०२० रोजी प्राप्त झाल्यानंतर कोणताही विलंब न करता सदरचा अर्ज दाखल केला आहे. वादी क्र. ०२ चे वारस खुशाल मधुकर पळसकर व लता प्रकाश काकडे ही त्यांची मुले असुन वादी क्र. ०२ च्या नावासमोर मयत असे लिहून तिच्या वारसांना अभिलेखावर घेण्याची विनंती केली. प्रतिवादींच्या वकीलांनी सदर अर्जास विरोध दर्शवितांना म्हटले की, अर्ज मंजुर करावयाचा असल्यास खर्चासह मंजुर करावा.

<u>०२</u> दोन्ही पक्षाचे कथन ऐकले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीच्या वकीलांनी दस्तऐवज यादी नि.क्र. ५१ खाली वादी क्र. ०२ च्या मृत्यु प्रमाणपत्राची प्रत दाखल केली आहे. त्यानुसार वादी क्र. ०२ चा मृत्यु दिनांक ०४.०८.२०२० रोजी झालेला दिसुन येतो. सदरचा अर्ज हा दिनांक ३०.०९.२०२० रोजी दाखल केलेला आहे. प्रतिवादीच्या वकीलांनी त्याच दिवशी म्हणणे दाखल केले आहे. मुदत कायद्याच्या आर्टिकल १२० नुसार वादी किंवा प्रतिवादी मयत झाल्यास वारस अभिलेखावर घेण्याकरीता मृत्यु दिनांकापासून ९० दिवसांचा कालावधी नमुद केलेला आहे. त्याअनुषंगाने अर्जदाराचा अर्ज हा मुदतीत आहे. अर्जातील वारस हे मयत लिलाबाई वारस नसल्याचा कोणताही सबळ आक्षेप अभिलेखावर आलेला नाही. अर्जाचे अवलोकन केले असता अर्जदार हे मयत लिलाबाई यांची मुले आहेत त्यांना अभिलेखावर घेण्याचा अर्ज नि.क्र. ५३ वर दाखल केलेला

आहे. त्यामुळे कोरोना कालावधी बघता नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र ठरत असल्याने मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्जदारांचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदारांना वादी क्र. ०२ चे वारस म्हणून अभिलेखावर घेण्याची परवानगी देण्यात येत आहे.

Digitally signed by Yogesh Dattatray Koinkar
Date: 2021.02.23 17:53:23 +0530

(यो.द. कोईनकर)

दिनांकः २३.०२.२०२१ दिवाणी नयायाधीश क.स्तर, रिसोड

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | P.D. Rudrakshawar |
| Name of court | : | C.J.J.D.& JMFC;Risod |
| Date | : | 23-02-2021 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | : | 23-02-2021 |
| Judgment/Order uploaded on | : | 23-02-2021 |